झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा१/मा.क्र२८८/रविवार पेठ/२७०३/२०२३
दिनांक : ०९/११ /२०२३

# झोपडपट्टी निर्मुलन आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३०/०६/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

२) ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये भवानी पेठ सि.स.नं. १०५९, रविवार पेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर (पूर्णत:) क्षेत्रफळ ४४७.३० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) यापैकी एकूण क्षेत्र ४४७.३० चौ.मी. (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त क्षेत्र' असा करण्यात आला आहे.) या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. मॉडर्न ग्रुप यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.३१/०३/२०२३ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदरच्या प्रस्तावास झो.पु.प्रा. नियमावली, २०१४ तील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि. १७/१०/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे; आणि

३) ज्याअर्थी, उक्त क्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ठ २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट-२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ४३ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र ४२, अपात्र ०० आणि बिगर निवासी पात्र ००, अपात्र ०१ आणि सार्वजनिक बांधकामे एकूण ०० या प्रमाणे एकुण पुनर्वसनास पात्र झोपडीधारक ४२ तर अपात्र ०१ ठरले आहेत; आणि

४) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र दि. १९/०९/२०१९ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जुलै २७ ते ऑगस्ट २, २०२३/श्रावण ५-११, शके १९४५ येथे प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजनाक्षेत्रात / झोपडपट्टीच्या जागेवर दि. ११/०७/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आला आहे; आणि

५) ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही. सबब, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

६) ज्याअर्थी, विकसक मे. मॉडर्न ग्रुप यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांचे तात्पुरते स्थलांतरण करणेसाठी पात्र झोपडीधारकांना कायमस्वरूपी पुनर्वसन सदनिका देण्यात येईपर्यंतच्या संक्रमण कालवधीकरीता भाड्याच्या रक्कमेचे धनादेश देण्याचे विकसक मे. मॉडर्न ग्रुप यांनी हमीपत्र सादर केले असून सदर मिळकतीतील एकूण ४३ कुटुंबांनी स्वेच्छेने स्थलांतरीत होऊन विकसकास जागा मोकळी करून दिलेली आहे; आणि

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे **'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र'** म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

<u>अनुसूची</u>

| पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सि.स.नं. १०५९, रविवार पेठ, पुणे झोपडपट्टी क्षेत्र. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पेठ / गाव / नगररचना योजना | स.नं. / सि.स.नं. / अंतिम भूखंड क्र. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| रविवार पेठ, पुणे | १०५९ | ३) खाजगी<br>४) विकसन हक्क प्राप्त - मे. मॉर्डन ग्रुप | ४४७.३० चौ.मी. | **पुर्वेस** - लागू बोळ व सि.स.नं. १०४५/२ | |
| | | | | **पश्चिमेस** - लागू रस्ता | |
| | | | | **दक्षिणेस** - लागू बोळ | |
| | | | | **उत्तरेस** - सि.स.नं. १०२८ व सि.स.नं. १०३८ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

**दिनांक :-** ०९ /११ /२०२३

9.11.23

**नीलेश र. गटणे,** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

8/11
O/C 8/11/23
8/11
9.11.23